# प्रकरण 9 (नियमपुस्तिका -8)

## निर्णय घेण्याच्या प्रक्रीयेत चालविण्यात येणारी कार्यप्रणाली

# प्रकरण 9 (नियमपुस्तिका -8)

## <u>निर्णय घेण्याच्या प्रक्रीयेत चालविण्यात येणारी कार्यप्रणाली</u>

**9.1 वेगवेगळया प्रकरणांत निर्णय घेण्यासाठी कोणती कार्यप्रणाली प्रचलित आहे? (सचिवालयीन नियमपुस्तिका आणि व्यवसाय नियम नियमपुस्तिका आणि इतर कायदे/ विनियम यांच्याकडे विचारार्थ पहावे)**

नवीन नोंदणी करण, नोंदणीचे नूतनीकरण, नोंदणी श्रेणीवाढ इ. विषयी अर्जदार व संस्थांकडून आवश्यक त्या दस्तऐवजासह प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी कार्यकारी अभियंता (संनियंत्रण व नोंदणीकरण) कक्ष या कार्यालयाकडून केली जाते . हे सर्व अर्ज नंतर पुढी ल छाननी व शिफारशीसाठी नोंदणी करण छाननी समितीच्या सभेमध्ये सादर केले जातात . नोंदणी छाननी समितीच्या शिफारशी या अंतिम मान्यतेसाठी सक्षम अधिकार्यांकडे सादर केल्या जातात (स्थापत्य ('स्थापत्य' संवर्गातील वर्ग- I(अ) व यांत्रिकी व विद्युत संवर्गातील वर्ग- अ करिता ). हयाबाबत "स्थापत्य आणि यांत्रिकी व विद्युत अभियांत्रिकी कामे करणार्यात कंत्राटदारांची नोंदणी नियमावली- 2016" चे नियम संदर्भित केले जातात.

**9.2 महत्वाच्या मुददयावर विशिष्ट निर्णय घेण्यासाठी कोणत्या प्रकारची लेखी कार्यपध्दती / आखून दिलेल्या कार्यपध्दती / कसोटीच्या व्याख्या /नियम कोणते आहेत? कोणत्या विविध पातळीवर निर्णय घेण्याच्या पध्दती आखल्या जातात?**

नवीन नोंदणीकरण, नोंदणीचे नूतनीकरण, नोंदणीची श्रेणीवाढ इ. करिता नमुना अर्ज आवश्यक असलेल्या संबंधित लेखी पुराव्यासहीत कार्यकारी अभियंता (संनियंत्रण व नोंदणी ) कक्ष यांच्या कार्यालयात स्विकारले जातात. हे सर्व अर्ज अंतिम मान्यता अथवा शिफारसींकरिता नोंदणीकरण छाननी समिती यांच्याकडे सादर केले जातात. 'स्थापत्य' संवर्गातील वर्ग-I(अ) व यांत्रिकी व विद्युत संवर्गातील वर्ग-अ करिता केलेले अर्ज हे नोंदणीकरण छाननी समिती च्या शिफारसींसाह सक्षम अधिकार्यां ना सादर केले जातात ('स्थापत्य' संवर्गातील वर्ग- I(अ) करिता नगर अभियंता व यांत्रिकी व विद्युत संवर्गातील वर्ग-अ करिता प्रमुख अभियंता (यांत्रिकी व विद्युत)).

**9.3 याबाबतचे निर्णय जनतेपर्यंत कळविण्यासाठी कोणत्या प्रकारची व्यवस्था करण्यात येते?**
सदर बाबत जनतेशी निगडीत नसल्यामुळे ती लागू पडत नाही.

**9.4 निर्णय घेण्याच्या पध्दतीसाठी कोणत्या विविध स्तरावरील अधिकऱ्याचे मत घेतले जाते?**

नोंदणीकरण छाननी समितीचे सभासद हे निर्णय घेण्याच्या कार्यपध्दतीमध्ये अंतर्भूत आहेत . तसेच स्थापत्य' संवर्गातील वर्ग-।(अ) करिता नगर अभियंता व यांत्रिकी व विद्युत संवर्गातील वर्ग- अ करिता प्रमुख अभियंता (यांत्रिकी व विद्युत) हे सक्षम अधिकारी काम पाहतात.

**9.5 निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता अंतिम प्राधिकारी कोण आहे?**

महानगरपालिका आयुक्त हे अंतिम प्राधिकारी आहेत.

9.6 सार्वजनिक प्राधिकरण यांनी महत्वाच्या विषयांवरील घेतलेल्या निर्णयाबाबतची माहिती खालील दिलेल्या तक्त्यामध्ये कृपया पुरविण्यात यावी.

निर्णय घेण्याबाबतचा विषय : नवीन नोंदणीसंबंधीचे अर्ज , नोंदणीची श्रेणीवाढ संबंधीचे अर्ज, इ.

मार्गदर्शिका /दिशा (जर असेल तर ) – नोंदणीकरण करण्याच्या नियमावलीनुसार अंमलबजावणी करण्याच्या कार्यपध्दती - वरील 9.1आणि 9.2 प्रमाणे

| | |
|---|---|
| अंतर्भूत असलेल्या अधिका-यांचे पदनाम | नगर अभियंता<br>प्रमुख अभियंता (यांत्रिकी व विद्युत)<br>कार्यकारी अभियंता (संनियत्रण व नोंदणी) कक्ष<br>सहाय्यक अभियंता (सं. व नों.) कक्ष (स्थापत्य/यां. व वि.)<br>लेखा अधिकारी |
| वर उल्लेख केलेल्या अधिका-यांच्या माहितीसाठी संपर्क - | दूरध्वनी क्रमांक 022-22620251<br>022-23403644 |
| निर्णयाबाबत समाधानी नसल्यास कुठे आणि कशाप्रकारे निर्णयाविरुध्द दाद मागाल? | "स्थापत्य / यांत्रिकी / विद्युत अभियांत्रिकी कामाकरिता कंत्राटदारांच्या नोंदणीकरणाची नियमावली – 2016" प्रमाणे स्थापत्य आणि यांत्रिकी व विद्युत कंत्राटदारांच्या नोंदणीकरण विषयीच्या कोणत्याही निर्णयाविरुध्द 30 दिवसांच्या आत लेखी स्वरुपात संचालक ( अ. से व प्र ) यांच्याकडे दाद मागता येते. यासंदर्भात अतिरिक्त आयुक्त / महानगरपालिका आयुक्त यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक असेल. |